**महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,कोल्हापूर विभागीय मंडळ,**
**कोल्हापूर५३९, राजेंद्रनगर,कोल्हापूर - ४१६ ००४.**

त्वरित श्रीराज्याभिषेक शके ३५०

**दुरध्वनी क्र - ०२३१ - २६९६१०१/२/३ Website-www.sscboardkolhapur.in Email Id- divsec.kop@gmail.com**

क्र.कोविमं/ए-१ गोपनीय/प्रा.प./13874
कोल्हापूर-४१६ ००४
दिनांक - २६.०३.२०२४

प्रति,
मुख्याध्यापक/प्राचार्य
सर्व मान्यताप्राप्त माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालये
सातारा/सांगली/कोल्हापूर.

विषय:- उच्च माध्यमिक प्रमाणपत्र ( इ.१२ वी ) व माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र परीक्षा ( इ.१० वी ) फेब्रुवारी-मार्च २०२४ चे तोंडी, प्रात्यक्षिक व अंतर्गत (Practical & Internal) मूल्यमापनाचे ऑनलाईन पध्दतीने भरलेल्या गुण/श्रेणी मधील दुरुस्त्याबाबत.

संदर्भ - क्र.रा.म/परीक्षा-२/१००९ दिनांक ०६/०३/२०२४ चे पत्र.

उपरोक्त संदर्भिय पत्रास अनुसरुन या विभागीय मंडळाच्या कार्यक्षेतील सर्व मान्यताप्राप्त उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालयांचे प्राचार्य तसेच माध्यमिक शाळेच्या मुख्याध्यापकांना कळविण्यात येते की, उच्च माध्यमिक प्रमाणपत्र ( इ.१२ वी ) व माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र परीक्षा ( इ.१० वी ) फेब्रुवारी-मार्च २०२४ चे तोंडी, प्रात्यक्षिक श्रेणी व अंतर्गत (Practical & Internal) मूल्यमापनाचे गुण अनुक्रमे दिनांक २९/०२/२०२४ व ०९/०३/२०२४ पर्यत ऑनलाईन पध्दतीने भरून मंडळास सादर केल्यानंतर सदर गुणांची Final Printout घेवून गुणतक्ते इ.१२ वी दिनांक ०४/०३/२०२४ व इ.१० वी १३/०३/२०२४ रोजी मंडळाकडे जमा करण्यात आलेले आहेत.

गुणतक्ते ऑनलाईन पध्दतीने सादर केल्यानंतरही काही विद्यार्थ्याच्या गुणात/विषयात बदल तसेच श्रेणीच्या विषयातील बदल असल्याबाबतचे प्रस्ताव विभागीय मंडळास प्राप्त होत आहेत. या संदर्भात आपणास सूचित करण्यात येते की, गुणात/विषयात,श्रेणी विषयातील दुरुस्ती करण्याची ही शेवटची संधी असून उच्च माध्यमिक प्रमाणपत्र ( इ.१२ वी ) करिता दिनांक ३०/०३/२०२४ व माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र ( इ.१० वी ) करिता दिनांक ०८/०४/२०२४ पर्यंत दुरुस्तीचे प्रस्ताव मंडळ कार्यालयात हस्तपोहोच जमा करावे. मार्च २०२४ चा निकाल जाहीर झाल्यानंतर प्रात्यक्षिक, श्रेणी, तोंडी व अंतर्गत मूल्यमापनाचे गुणातील दुरुस्तीचे प्रस्ताव कोणत्याही परिस्थितीत स्वीकारले जाणार नाहीत याची संबधीत प्राचार्य व मुख्याध्यापकांनी कटाक्षाने नोंद घेवून त्वरित उचित कार्यवाही करावी.

( सुभाष रा.चौगुले)
विभागीय सचिव,
कोल्हापूर विभागीय मंडळ, कोल्हापूर

प्रत माहितीसाठी

१) मा. सचिव,
महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, राज्यमंडळ, भांबुर्डा, पुणे.